परिशिष्ट 'फ'

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण


१ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक. संकिर्ण२२२१/प्र.क्र. ०३/प्रनिप्रा/१८८अ दि.०८/०२/२०२१

## परिपत्रक

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रिये दरम्यान विविध टप्प्यांवर विद्यार्थी, पालक किंवा हितसंबंधीत घटक (Stake-holders) अनेक तक्रारी प्राप्त होत असतात.

उक्त अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (२) (दोन) मध्ये तक्रार निवारण यंत्रणेसंबंधी कार्यपद्धती विहीत करण्याची तरतूद आहे. तसेच ९ (५) (चार) मध्ये प्रवेशासंबंधीच्या प्राप्त तक्रारीसंदर्भात प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीबाबत पुढील प्रमाणे तरतूद केली आहे. "प्रवेशासंबंधीची कोणतीही तक्रार प्राधिकरणासमोर दाखल करता येईल व पंधरा दिवसांच्या आत व प्रवेशाच्या अंतिम दिनांकापुर्वी त्यावर निर्णय घेण्यात येईल."

वरील तरतुदीनुसार प्रवेश परीक्षा व प्रक्रियेसंदर्भात प्राप्त तक्रारींवर निर्णय घेण्यासाठी संबंधीत विभागात खालीलप्रमाणे तक्रार निवारण यंत्रणा समिती तयार करण्यात येत आहे.

**तक्रार निवारण समिती :-**

१. संबंधीत विभागाचे परीक्षा समन्वयक
२. संबंधीत विभागाचे सहाय्यक परीक्षा समन्वयक
३. CAP बाबत तांत्रिक सहाय्यक

**तक्रार निवारण यंत्रणेची कार्यपद्धती -**

१. तक्रार प्राप्त झाल्यानंतर ती प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापूर्वीची तक्रार असणे आवश्यक असेल.
२. प्रवेश परीक्षा प्रक्रियेबाबत संबंधीत विभागाकडे प्राप्त होणा-या तक्रारींची वरीलप्रमाणे गठित समितीकडून पडताळणी, शहानिशा करुन प्राथमिक माहिती तयार करुन तद्नंतर संबंधीत विभाग तक्रार आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडे सादर

८/२/२१

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

करतील. सदरील तक्रार मा. प्रवेश नियामक प्राधिकरणासमोर सादर करणे जरुरीचे आहे किंवा कसे याबाबत आयुक्त, राज्य सीईटी कक्ष हे मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करतील. (सोबत तक्रार पडताळणी अहवाल नमूना)

३. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण अश्या तक्रारींबाबत संबंधीतास आवश्यक तेथे सुनावणी देवून सुस्पष्ट आदेशान्वये तक्रार निवारण करतील.

४. सदरची कार्यवाही प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापूर्वी होईल यांची संबंधीत दक्षता/काळजी घेतील.

५. प्राप्त होणा-या तक्रारीबाबतची संपुर्ण माहिती प्राधिकरणाचे बैठकीत यथावकाश अवलोकनार्थ सादर करतील.

सोबत- तक्रार पडताळणी अहवाल नमूना

(चिंतामणी जोशी,) भा.प्र.से.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य
सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
मुंबई

प्रति,
सर्व संबंधीत अधिकारी

प्रत,

१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, माहितीकरिता.
२. प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
३. माहिती व तंत्रज्ञान विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी.
४. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

D:\मुक्ता\२०२०-२१\तक्रारींबाबत.docx

गठित समिती/विभागीय माहिती सादर करण्यासाठी

**तक्रार पडताळणी अहवाल नमूना -**

**विभागाचे नाव -**

१. तक्रारदाराची प्राथमिक माहिती -

२. अभ्यासक्रम -

३. तक्रार व तक्रारीचे स्वरुप -

a) उमेदवाराच्या बाजूने त्रुटी

b) तांत्रिक त्रुटी

c) नियम व माहिती पुस्तिका संदर्भ

d) न्यायालयीन आदेश

४. तक्रार निवारणाचा संदर्भ - कोणत्या नियमानुसार कार्यवाही -

५. तक्रारीचे निवारण - समितीचे अभिप्राय/कार्यवाही -

६. मा. आयुक्त यांचे अभिप्राय -

७. मा. प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे आदेश -

********

**(जे. पी. डांगे)**
**अध्यक्ष**
**प्रवेश नियामक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य**

D:\मुक्ता\२०२०-२१\तक्रारींबाबत.docx